27 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात न्या. अमित बोरकर यांचा सत्कार करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत विद्यापीठाचे अधिकारी.

# माजी विद्यार्थी न्यायमूर्ती होणे अभिमानास्पद

## कुलगुरू शिर्के; न्या. अमित बोरकर यांचा विद्यापीठात सत्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असलेल्या अमित बोरकर यांची मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती होणे ही विद्यापीठ परिवाराबरोबरच कोल्हापूरवासीयांसाठी अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी काढले.

मुंबई उच्च न्यायालयाचे न्या. अमित बोरकर यांचा गुरुवारी शिवाजी विद्यापीठातर्फे सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, न्या. बोरकर यांनी विद्यापीठाच्या वकिलांच्या पॅनलवर प्रभावी काम केले. कर्तबगारीच्या बळावर त्यांनी न्यायमूर्ती पदापर्यंत झेप घेतली आहे.

न्या. बोरकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याचा अभिमान आहे. विद्यापीठाचा वकील म्हणून काम करण्याची संधी लाभली. विद्यापीठाप्रती निष्ठा, प्रामाणिकपणा व कष्टाळू वृत्ती हे येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांचे गुणवैशिष्ट्य मला भावले.

प्रास्ताविक प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. विधी अधिकारी अॅड. अनुष्का कदम यांनी आभार मानले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी विभा अंत्रेडी उपस्थित होते.

पुढारी

# 'कोल्हापुरात उच्च न्यायालयाचे खंडपीठ होणे गरजेचे'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापुरात मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे निवृत्त न्या. टी. व्ही. नलावडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विधि अधिविभागामार्फत पाच दिवसीय कार्यशाळेचे 'ज्युडिशियल एक्झामिनेशन प्रिपरेशन अ‍ॅन्ड फंडामेंटल्स ऑफ कोर्ट प्रॅक्टिस' या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अ‍ॅड. सूर्यकांत मिरजे यांनी भारती साक्षी-पुरावा अधिनियम या विषयावर विचार मांडले. प्रास्ताविक विधि अधिविभागातील विभागप्रमुख डॉ. व्ही. वाय. धुपदाळे यांनी केले. अ‍ॅड. आदिती वडेर यांनी सूत्रसंचलन केले. साहाय्यक प्रा. माधवी माळगे यांनी आभार मानले.

सकाळ




कोल्हापूर : प्रा. डॉ. विशाल कुरणे यांच्या ‘कुंभार समाज : संस्कृती आणि वाटचाल’ ग्रंथाच्या प्रकाशनप्रसंगी प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. प्रतिमा पवार, प्रा. डॉ. अर्चना जगतकर, उषा पाटील.